# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

कुलसचिव

दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२


## परिपत्रक

क्र. साप्रवि/जमीन/परिपत्रक ७/१२/१२९७/२०२३ दिनांक : २३/११/२०२३

विद्यापीठाचे विविध कार्यालयाअंतर्गत प्रक्षेत्र, संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, घटक महाविद्यालये, कृषि तंत्र विद्यालये तसेच इतरही केंद्र व विभाग यांना विद्यापीठाची जमीन वितरीत करण्यात आलेली आहे. प्रत्येक कार्यालयाअंतर्गत वितरीत केलेल्या जमीनीचे ७/१२ विद्यापीठाच्या नावाने अद्यावत करुन घेणे तसेच या ७/१२ व ८ अ वर पाण्याचे स्त्रोत असल्यास (तलाव, विहिर, नाला, बोअरवेल, इत्यादी संसाधने) यांची नोंद असणे आवश्यक आहे. याबाबत जमिनीचे बरेचसे वाद निर्माण झालेले असुन अनेक प्रकरणे मा. न्यायालयात दाखल आहेत.

त्याअनुषंगाने नियंत्रण अधिकारी, कार्यालय प्रमुख, विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, जमिनीबाबत अनेक वादग्रस्त प्रकरणे नावे होणेबाबत प्रलंबित असुन जमिन सीमावाद व न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवू नये या दृष्टीने विद्यापीठाच्या जमिनीचे ७/१२ व ८ अ वर पाण्याच्या संसाधनासह **कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला** अशी अद्यावत नोंद करुन घेण्याची कार्यवाही आपले स्तरावर करण्यात यावी आणि त्या अद्यावत ७/१२ व ८ अ ची प्रत या कार्यालयास तातडीने सादर करण्यात यावी. सदर कार्यवाही त्वरीत करण्यात यावी तसेच याबाबत काही अडचणी असल्यास कुलसचिव कार्यालयाशी संपर्क साधावा.

मा. कुलगुरु महोदय यांचे मंजुरीने निर्गमित.

(सुधीर राठोड)
**कुलसचिव**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

**प्रतिलीपी :**

१) संचालक (सर्व) ----------
२) अधिष्ठाता (सर्व) ----------
३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ----------
४) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) ----------
५) कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र (सर्व) ----------
७) प्राचार्य, कृषितंत्र विद्यालय (सर्व) ----------
८) प्रभारी अधिकारी (सर्व) ----------
९) प्रभारी अधिकारी (ARIS Cell), यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
१०) विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) ----------
११) विद्यापीठ नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१२) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१३) सहाय्यक कुलसचिव (आस्थापना/साप्रवि/परिक्षा/समिती/प.शि.सं./कृ.म.वि./उ.वि.म./व.वि.म./कृषि अभि.) ---------
१४) सहाय्यक नियंत्रक (अंदाजपत्रक/मुख्यालय)/ अधिदान व लेखाधिकारी (अकोला/ नागपूर)
१५) मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक/ तांत्रिक सचिव/ विशेष कार्यकारी अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
१६) मा. कुलसचिवांचे स्वीय सहायक यांना माहितीकरीता सादर.
१७) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१८) ----------